# प्रकरण पहिले

## संशोधन पध्दती व अंक संकलन

# प्रकरण पहिले

## संशोधन पध्दती व अंक संकलन

### १.१ प्रस्तावना :

भारतात शेती व्यवसायास पूरक असणाऱ्या उद्योगधंद्यापैकी दुग्धव्यवसाय हा एक महत्वपूर्ण पूरक व्यवसाय आहे. भारतात दुधाळ जनावरे व त्यासाठी आवश्यक असणारी चराऊ जमीन विपूल प्रमाणात उपलब्ध आहे. दुधाळ जनावरांच्या निपजासाठी भारतातील हवामान अनुकूल आहे आणि म्हणूनच भारतीय शेतकऱ्यास उत्पन्न मिळवून देणारा दुग्धव्यवसाय हा एक पूरक व्यवसाय आहे. विशेषत: गरीब शेतकरी व शेतमजूरांना दूध व्यवसाय ही एक पर्वणी आहे. दुष्काळी भागात याचे महत्व अनन्यसाधारण असे आहे.

दूध हे प्रमुख उत्पादन असून ते जनावरापासून उपलब्ध होते. याशिवाय जनावरापासून मिळणारे शेण, कातडी, हाडे, मांस ही पुन्हा उत्पन्न मिळवून देणारी उत्पादने आहेत.

भाकड जनावरे शेतीकार्यासाठी वापरली जातात. दूध हे पूर्णान्न मानले जाते. म्हणूनच दुधास लोकसंख्येच्या सर्व स्तरातून मागणी असते.

प्राथमिक दुग्ध सहकारी संस्था व जिल्हा दुग्ध संघ यांनी गरीब शेतकरी वर्गास पतक्षम व उत्पादक बनविले आहे. विशेषत: जिल्हा दुग्ध सहकारी संघानी ग्रामीण भागात दुग्धव्यवसाय विकासाच्या दृष्टीने प्रेरणा दिली आहे व विकास घडवून आणलेला आहे व हा व्यवसाय अधिक लाभदायक व अर्थक्षम बनविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

लघु स्वरूपाची प्राथमिक दुग्ध सहकारी संस्था जी ग्रामीण स्तरावर केंद्रित झालेली असते, तिच्या मार्फत दुग्धव्यवसायाशी निगडीत असणारी सर्व कार्य

मोठया प्रमाणात व अर्थक्षम स्वरूपात हाताळली जात नाही. परंतु सहकारी दुग्धव्यवसायाची उभारणी संघीय संस्थेमार्फत झाली असता हे कार्य अधिक अर्थक्षम बनते आणि म्हणूनच संघीय संस्थेचा अभ्यास हा मुलभूत व महत्वाचा ठरतो.

१.२ समस्येची मांडणी :

प्राचीन काळापासून ते अद्यापपर्यंत भारतातील दुग्ध व्यवसाय भारतीय संस्कृतीचा अविभाज्य घटक राहिला आहे. आपल्या पूर्वजांनी या उद्योगांचे आर्थिक दृष्टीकोनातून महत्व जाणले होते.

भारतीय अर्थव्यवस्था शेतीप्रधान असून ७० % पेक्षा जास्त लोक शेती-व्यवसायावर अवलंबून आहेत. ग्रामीण भागात इतर उद्योगांचा विकास झालेला नसल्यामुळे शेतीक्षेत्रातील अतिरिक्त लोकसंख्या कमी करणे शक्य होत नाही. पाण्याच्या कमतरतेमुळे शेती व्यवसाय हंगामी स्वरूपाचा आहे. त्यामुळे लोकांना मिळणारा रोजगार कमी असून त्यांना मिळणारे उत्पन्न देखील अपुरे आहे. अशा परिस्थितीमध्ये दुग्धव्यवसायाला महत्व प्राप्त झाले आहे.

महाराष्ट्र हे कृषीप्रधान राज्य असल्याने महाराष्ट्रात हरितक्रांतीने मूळ धरले, आणि ती जोमाने फोफावली, असे असले तरी आपल्या राज्यातील अनिश्चित पाऊस आणि ओलित सोयीची कमतरता यामुळे शेतीवर खूपच मर्यादा पडतात. म्हणून दुग्धव्यवसायासारखा दुसरा असा उत्तम जोडधंदा कोणताच नाही.

दुग्धव्यवसाय हा ग्रामीण अर्थव्यवस्थेतील एक भक्कम दुवा आहे याची जाणीव होऊनच महाराष्ट्र शासनाने गेल्या काही वर्षात दुग्धव्यवसाय वाढविण्या-मध्ये भरीव प्रगती केली आहे. या व्यवसायाद्वारे ग्रामीण भागातून शहराकडे पाठवलेल्या दुधापोटी दूध उत्पादकांना आजपावेतो कोटयावधी रूपये प्राप्त झाले आहेत. म्हणून दुग्ध व्यवसायाला अर्थव्यवस्थेत किती महत्वाचे स्थान आहे हे लक्षात येते. आणि दुग्धव्यवसायाच्या अभ्यासाची गरजही लक्षात येते.

दुग्धव्यवसायाला अर्थव्यवस्थेत महत्वाचे स्थान असल्यामुळे संघ पातळीवरील अभ्यासाची गरज आहे. म्हणून उस्मानाबाद जिल्हा दूध उत्पादक व पुरवठा सहकारी संघाच्या अभ्यासाची गरज वाटली. कारण या संघाच्या कार्यक्षेत्रामध्ये पावसाचे व कालव्याखालील ओलिताचे प्रमाण कमी असल्याने दुबार पिकाखालील क्षेत्र कमी आहे. त्यामुळे या संघाच्या कार्यक्षेत्रामध्ये शेती उत्पादनामध्ये वाढ होऊ शकत नाही. म्हणून ग्रामीण भागातील लोकांना दुग्धव्यवसाय हा उपजिविकेचे साधन बनले आहे. दुग्धव्यवसायासारखा पुरक व्यवसाय सुरु झाल्यामुळे ग्रामीण भागातील लोकांना उत्पन्नाचे दुग्ध व्यवसाय हे साधन झाले आहे. उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये सुमारे ८४.७८ % लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. म्हणून शेती व्यवसायात ग्रामीण भागातील लोकांना वर्षभर रोजगार प्राप्त होत नाही. त्यामुळे शेती व्यवसायाला पुरक व्यवसाय म्हणून दुग्ध व्यवसाय सुरु झाल्यामुळे ग्रामीण भागातील लोकांना स्वत:चा दैनंदिन खर्च भागवता येत आहे. त्यामुळे उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये दुग्ध व्यवसायाला महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. शिवाय उस्मानाबाद जिल्हा संघाची स्थापना दूधाचा महापूर योजना अंतर्गत झाल्यामुळे त्याचे एक वेगळेपण आहे. या दृष्टीने त्या संघाच्या अभ्यासाची गरज आहे. म्हणून उस्मानाबाद जिल्हा दूध उत्पादक व पुरवठा सहकारी संघ अभ्यासासाठी निवडला आहे.

## १.३ अभ्यासाची उद्दिष्टये :

१) उस्मानाबाद जिल्हा दूध उत्पादक व पुरवठा सहकारी संघ मर्यादित याच्या कार्याचा अभ्यास करणे.

२) दुग्ध व्यवसायाची लाभप्रदता अभ्यासणे.

३) दुग्ध उत्पादन लाभखर्च याबाबत विश्लेषण करणे.

४) दुग्ध उत्पादनाच्या क्रयविक्रय समस्याचा अभ्यास करणे.

५) दूध संकलन व दुधाचे वितरण यातील विविध प्रकारच्या प्रवृत्त्या अभ्यासणे

## १.४ संशोधन पध्दती व संशोधन आराखडा :

हा अभ्यास करण्यासाठी दुय्यम स्वरूपाची साधनसामुग्री वापरली आहे. उस्मानाबाद जिल्हा दूध उत्पादक व पुरवठा सहकारी संघाच्या वार्षिक अहवालातून व इतर संबंधित कार्यालयातून माहिती व आकडेवारी गोळा करण्यात आली आहे. संबंधित दस्तऐवजही विचारात घेतले आहेत. इतर आवश्यक माहिती निरीक्षण, प्रश्नावली, व मुलाखतीद्वारे मिळविली.

या अभ्यासासाठी संघ ही एकमेव संस्था अभ्यासात घेतली आहे. त्यामुळे सहाजिकच अभ्यासाचे मुख्य क्षेत्र संघ व त्याची कामगिरी यावर केंद्रित झालेली आहे. १९८३ ते १९९३ या दहा वर्षातील संघाच्या कार्याचा आढावा घेतला आहे.

## १.५ अंक संकलन व त्याचे विश्लेषण :

उस्मानाबाद जिल्हा दूध उत्पादक व पुरवठा सहकारी संघाचा अभ्यास करीत असताना आवश्यक आकडेवारी संघाच्या वार्षिक अहवालातून तसेच इतर संबंधित असणाऱ्या संस्थामधून जमा केली आहे. कांही आकडेवारी व माहिती संघाचे कार्यकारी संचालक व दुग्धविकास अधिकारी यांच्या मुलाखतीद्वारे जमा केली आहे. बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, वेणुताई चव्हाण कॉलेज, कराड, कराड नगरपालिका नगर वाचनालय आदी ग्रंथालयामधून आवश्यक माहिती व संदर्भ अभ्यासले. काही महत्वाची माहिती वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी व्यवस्थापन संस्था, पुणे यांच्या ग्रंथालयातून मिळविली. संकलित माहिती व आकडेवारीचे विश्लेषण प्रमाणपध्दती व सरासरी पध्दतीचा वापर करून आकडे-वारीचा निष्कर्ष काढलेला आहे.

## १.६ प्रकरणांची संक्षिप्त माहिती :

या अभ्यासामध्ये सहा प्रकरणाचा समावेश आहे.

पहिले प्रकरण संशोधन पध्दती व अंकसंकलन यासंबंधित आहे.

त्यामध्ये प्रस्तावना, समस्येची मांडणी, अभ्यासाची उद्दिष्टये, संशोधन पध्दती व संशोधन आराखडा, अंकसंकलन व त्याचे विश्लेषण यांचा त्यामध्ये समावेश आहे.

दुस-या प्रकरणामध्ये दूध व्यवसायाचे महत्व, धोरण आणि वस्तुस्थितीचे विश्लेषण केले आहे. यामध्ये भारतातील नियोजन काळातील दुग्धव्यवसाय, दुग्ध-व्यवसायाचे फायदे, सहकारी चळवळीचे योगदान, दुग्ध सहकारी संस्थाना शासकीय मदत, सरकारी धोरण, महाराष्ट्रातील दुग्धव्यवसायाची वस्तुस्थिती, इ. चा समावेश आहे.

तिस-या प्रकरणामध्ये उस्मानाबाद जिल्ह्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी, भौगोलिक पार्श्वभूमी, कृषी अर्थव्यवस्था, पशुधन, दूध व्यवसाय, जिल्ह्यातील सहकारी चळवळ आणि समारोप यांचा यामध्ये समावेश आहे.

चौथ्या प्रकरणात संघाच्या सर्वसाधारण अर्थव्यवस्थासंबंधीचे स्पष्टीकरण आहे. त्यामध्ये संघाची स्थापना, उद्दिष्टये, संघटन आणि व्यवस्थापन, घटना-पोटनियम, संचालक मंडळाचे अधिकार, कामे व जबाबदा-या, सभासद, भागभांडवल, संघाचे उत्पन्न, संघाचा खर्च, संघाला मिळालेले कर्ज व अनुदान, ठेवी, संघाचा नफा व तोटा आदी उपभागांचा समावेश आहे.

प्रकरण पाचव्यामध्ये दूध संकलन व दूध वितरण यासंबंधीचे सविस्तर विवरण आहे. दूध संकलन दूध उत्पादकाना दिली जाणारी प्रलोभणे, दूधाचे वितरण यांचा त्यामध्ये समावेश आहे.

शेवटच्या प्रकरणामध्ये संघाच्या समस्या, उपसंहार आणि कांही सूचना केल्या आहेत.

......